# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचे कार्यालय.

फोन नं. (02456) 221456 फॅक्स नं. 221456 ईमेल dydeohingoli@gmail.com


*************************************************************************

**निवडणूक प्राधान्य तात्काळ**

जा.क्र.2019/निवडणूक/लोसनि/कावि-
दिनांक: 07/05/2019.
08

**दरपत्रक मागविण्यासाठी जाहिर सुचना**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक- 2019 च्या अनुषंगाने 15- हिंगोली लोकसभा मतदारसंघात दिनांक: 18/03/2019 रोजी झालेल्या मतदानाची मतमोजणी दिनांक: 23/05/2019 रोजी शासकीय तंत्रनिकेतन, एम.आय.डी.सी. परिसर, लिंबाळा मक्ता, ता. जि. हिंगोली येथे होणार असून त्यासाठी 15- हिंगोली लोकसभा मतदारसंघात समाविष्ठ असलेल्या 82- उमरखेड, 83- किनवट, 84- हदगाव, 92- वसमत, 93- कळमनुरी आणि 94- हिंगोली या विधासभा मतदारसंघात झालेल्या मतदानाची मतमोजणी करण्यासाठी सहा स्वतंत्र मतमोजणी कक्ष तयार करण्यात आले आहेत. तसेच मा. निवडणूक निरिक्षक, मा. निवडणूक निर्णय अधिकारी, नियंत्रण व मिडीया कक्ष असे तीन अतिरिक्त कक्ष तयार करण्यात आले आहेत.

उपरोक्त प्रमाणे कक्षात मतमोजणी कामी वापरावयाचे किमान 15 संगणक संच एकमेकाशी जोडण्यासाठी 9 ते दहा कक्षामध्ये लॅन नेटवर्क तयार करणे कामी स्थानिक पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. पुरवठादारांनी आपली दरपत्रके जाहिर सुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून किमान सात दिवसाचे आत निवडणूक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे सादर करावीत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केल्या जाणार नाही. दरपत्रकात दर सादर करताना लॅन नेटवर्क तयार करण्यासाठी लागणारा केबल, स्विचेश, कनेक्टर, केशींग, मजूरी इत्यादी सर्व बाबींच्या दराचा विचार करून एकत्रित दराचे दपत्रक सादर करावे. प्रत्यक्ष मतमोजणीपुर्वी नेटवर्कची टेस्टींग करणे तसेच मतमोजणीच्या दिवशी योग्य इतक्या मनुष्यबळासह तसेच संसाधानासह मतमोजणी केंद्रावर हजर राहणे पुरवठादारावर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

(रूचेश जयवंशी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**हिंगोली.**

**प्रत:-**

1. सुचना व विज्ञान अधिकारी, हिंगोली यांना जिल्हा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी आवश्यक कार्यवाहीस्तव
2. सर्व उपविभागीय अधिकारी तथा सहा. निवडणूक अधिकारी 15- हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
3. सर्व तहसिलदार, हिंगोली जिल्हा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
4. जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी.